**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 1 | Sept 2014** **ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *पिलीवची किल्लेवजा गढी*

*गाजरे सुनिता दत्तात्रय*

***सारांश :***


सोलापूर जिल्हयातील, माळशिरस तालुक्यातील पिलीव हे गाव ऐतिहासिकदृष्टया महत्त्वपूर्ण आहे. पंढरपूर—सातारा रोडवर, पंढरपूर पासून 40 किलोमीटर तर सोलापूर पासून 80 किलोमीटर अंतरावर पिलीव हे गाव आहे.[1]

पूर्वी पिलीव अक्कलकोट संस्थानचा एक भाग होता. पिलीवच्या जहागीरदारांच्या अधिपत्याखाली बारा ते तेरा गावे होती. सन 1690 साली धनाजी जाधव व मोगल सरदार लुत्फुल्लाखान यांची लढाई झाली. या लढाईत मराठा सरदार धनाजी जाधव यांनी अपु—या साधनसामुग्रीनिशी यशस्वी टक्कर दिली. परंतु यामध्ये धनाजी जाधवांना वीर मरण आले व मराठयांना माघार घ्यावी लागली.[2]

## *प्रस्तावना :*

अक्कलकोटचे पहिले फत्तेसिंग भोसल्याचा वारसदार म्हणून शहाजी भोसले हे पिलीव घराण्यातून सन 1760 मध्ये अक्कलकोटच्या गादीवर आले. त्यांनी सन 1777 पर्यंत जहागीरदारीचा कारभार सांभाळला. हैदरअलीने मराठयाचा शिवाजीच्या वेळचा स्वराज्याचा भाग बळकावून त्रास दिल्याने माधवराव पेशव्याच्या काळात तेथे दरवर्षी लढाया होवून मुलुख सोडवून घेण्याचे कष्ट करावे लागले. हैदरअलीच्या तिस—या स्वारीत अक्कलकोटचे शहाजी भोसले पेशव्यांबरोबर जवळपास दोन वर्षे कर्नाटकात होते. त्यावेळी हैदरबरोबर पेशव्यांच्या झालेल्या लढाईत शहाजी भोसले यांच्या बरोबर पिलीवचे भगवानराव भोसले हेही आपले पन्नास स्वारांचे पथक घेऊन हजर होते.[3] अक्कलकोटचे शहाजी भोसलेंबरोबर पुढे उत्तर हिंदुस्थानात अल्ली बहाददरच्या सैन्यात हे भगवानराव भोसले त्यांच्याबरोबर स्वारीत गेले असण्याचा संभव आहे.[3]

### *पिलीव येथील जहागीरदार घराण्याची वंशावळ*



पिलीव येथील जहागीरदारांची गढी अगदी मजबूत स्थितीत आहे व ऐतिहासिकदृष्टया महत्त्वपूर्ण आहे.

### गढीची तटबंदी :



पिलीव येथील जहागीरदारांच्या गढीची तटबंदी अजूनही चांगल्या स्थितीत व भक्कम आहे. दगड व चुन्याचा वापर करुन ही तटबंदी बांधलेली आहे.

गढीच्या बांधकामासाठी वापरण्यात येणा–या चुन्याच्या घाणी अजुनही गढीच्या समोरील बाजूस अस्तित्वात आहेत.

### गढीचे बुरुज :



गढीला एकूण पुढील बाजूस 3 व मागील बाजूस 3 असे 6 बुरुज आहेत. त्यातील दोन बुरुजांवर जाण्यासाठी असलेल्या पाय–या ढासलेल्या आहेत. परंतु इतर बुरुजांवर जाणा–या पाय–या चांगल्या स्थितीत असल्याने वर जाता येते. प्रवेशद्वाराच्या बाजूला निशाण बुरुज आहे. तेथे चैत्र पाडव्याच्या दिवशी अजुनही नवीन निशाण चढविले जाते.

बुरुजावरती माची आहेत, तोफा ठेवण्याची जागा आहे. तसेच दोन्ही बुरुजाच्या मध्ये सुद्धा तोफ ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. तेथे अजुनही तोफेचे अवशेष शिल्लक आहेत. पूर्ण तटबंदीला संरक्षणाच्या दृष्टीने समोरील शत्रूवर हल्ला करता येण्यासाठी जंग्या ठेवलेले आहेत. बुरुजाचे बांधकाम दगडी असून भक्कम अवस्थेत आहे. तटबंदीच्या भिंतीत व बुरुजावरती ठिकठिकाणी जंग्या आहेत. आजही हे बुरुज चांगल्या स्थितीत आहेत. बुरुजावर वेळोवेळी डागडुजी केल्याचे बांधकामावरुन दिसून येते.

### गढीचे प्रवेशद्वार :



गढीचे प्रवेशद्वार चांगल्या स्थितीत आहे. प्रवेशद्वारावर कमान दिसून येते. प्रवेशद्वाराचा दरवाजा हा अलीकडील काळात बदललेला दिसून येतो. ते गजपृष्ठाकृती आहे. प्रवेशद्वार साधारणपणे 10 फूट उंच आहे. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर दोन प्रवेशद्वारे दिसून येतात. परंतु सध्या एक चांगल्या स्थितीत आहे. डावीकडील प्रवेशद्वारातून आत गेल्यावर तेथे जहागीरदारांचे वंशज राहतात. सध्या गढीमध्ये जहागीरदारांची चार कुटुंबे राहत आहेत. तर उजवीकडील प्रवेशद्वाराद्वारे पाण्याच्या अष्टकोनी विहिरीकडे जाता येते. परंतु तो भाग सध्या वापरात नाही.

***गढीतील इमारती :***



गढीमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीमध्ये अंबराखाना व शस्त्रागार, ते तटबंदीला लागूनच आहे व सध्या ते बंद केलेले आहे. गढीचा आकार मोठा आहे. साधारणपणे 5.30 ते 6 एकर जागेमध्ये ही गढी बांधलेली आहे. सध्या गढीची विभागणी ही चार बंधूंमध्ये झालेली आहे.

***म्हसोबा मंदिर :***

गढीच्या पश्चिमेकडील बुरुजाजवळ बाहेरील बाजूस म्हसोबाचे मंदिर आहे. गढीचा बुरुज चढत नव्हता. तेव्हा म्हसोबा स्वप्नात आल्याने लोटेवाडीच्या म्हसोबाचे स्थान म्हणून तेथे मंदिर उभे करण्यात आले. आज तो नवसाला पावणारा म्हसोबा म्हणून ओळखला जातो व नित्यनियमाने पूजाअर्चा केली जाते.


***बारव :***

गढीमध्ये पाणी पुरवठयासाठी निर्माण केलेली उल्लेखनीय अशी एक अष्टकोनी बारव आहे. अशी वैशिष्टयपूर्ण बारव क्वचितच पाहायला मिळते. विहिरीकडे जाण्याचा मार्ग व विहिरीचे बांधकाम अगदी सुव्यवस्थित आहे. त्यामुळे विहिरीच्या मार्गाने अगदी तळापर्यंत जाता येते. बारव सध्या गाळ साचल्याने कोरडी आहे.

गढीतील लोकांना अगदी व्यवस्थित पाणी पुरवठा या विहिरीद्वारे होत असे. विहिरीला जाणा—या मार्गातून

ठिकठिकाणी मोठमोठे कमानयुक्त कोनाडे आहेत. साधारणपणे 60 ते 70 पाय—या उतरुन आपण विहिरीच्या तळापर्यंत जावू शकतो. विहिरीचे संपूर्ण अष्टकोनी बांधकाम दगड व चुना वापरुन केलेले आहे.

***चुन्याची घाणी :***



गढीच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजूला दोन चुन्याच्या घाणी आढळून येतात. या गढीच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारा चुना हा या ठिकाणी असणा—या चुन्याच्या घाणीतून तयार केला जात असावा.

***गढीतील ऐतिहासिक शस्त्रास्त्रे :***



गढीमध्ये सध्या रहात असलेल्या जहागीरदार कुटुंबाकडे भाल्यांची टोके, तसेच ढाली, तलवारी आहेत. तसेच इंग्रजांच्या काळातील दोन पिस्तुले आहेत. जहागीरदारांच्या म्हणण्याप्रमाणे गढीतील सर्व शस्त्रे ही अक्कलकोट येथील शस्त्रास्त्रे संग्रहालयात ठेवण्यात आलेली आहेत.

***निष्कर्ष :***

पिलीव येथील जहागीरदारांच्या गढी मराठेकालीन घटनांची साक्षीदार असून ती अजूनही चांगल्या स्थितीत उभी आहे. यावरुन तिचा भक्कमपणा दिसून येतो. गढीमध्ये असलेली अष्टकोनी बारव उल्लेखनीय आहे. पिलीव येथील गढीची ऐतिहासिक कागदपत्रे फारशी उपलब्ध नसल्याने पुरेशी ऐतिहासिक माहिती मिळत नाही. परंतु वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहिले असता पिलीवची किल्लेवजा गढी वैशिष्टयपूर्ण आहे. ही गढी गावामध्ये उंचीवरील ठिकाणी असून दोन बुरुज सोडता बाकी सर्व तटबंदी व्यवस्थित आहे. बुरुजावर गेल्यावर संपूर्ण पिलीव व आसपासचा परिसर अगदी व्यवस्थित पाहायला मिळतो. अर्थातच लष्करी दृष्टीकोनातून या गढीचे बांधकाम झालेले आहे.

पिलीव येथील या ऐतिहासिक गढीचे संरक्षण होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यकता आहे. अशा या अनमोल ऐतिहासिक वास्तू जिवंत राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी सरकारची मदत मिळणे गरजेचे आहे.

*संदर्भ ग्रंथ :*

1. http://en.wikipedia.org/wiki/piliv 30/05/2014
2.देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्हयाचा इतिहास, मराठा कालखंड भाग–1, रेवू प्रकाशन, पंढरपूर, पृ.क्र. 567.
3. कित्ता, पृ.क्र. 567.
4. खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड 4 था, मिरज, पृ.क्र. 1469
5. प्रत्यक्ष भेट, मुलाखतीद्वारे माहिती मिळविली व फोटोग्राफी.